दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार , 06 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 144 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# जिल्ह्यातील दुष्काळ पाहून ना. पंकजाताई मुंडे हेलावल्या ; शेतकऱ्यांच्या संकटावर व्यक्त केली चिंता

## घाबरू नका ; सरकार पाठिशी आहे ; आवश्यक ती सर्व मदत करण्याचा दिला शब्द

## वडवणी, धारूर, माजलगांव, गेवराईत केली पीक नुकसानीची पाहणी



■ बीड प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे आज सलग दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावर होत्या. शेतातील पीक पूर्णपणे हातातून गेले हे सांगताना शेतकऱ्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट पाहून ना. पंकजाताई मुंडे यांचे मन देखील हेलावले. अशा परिस्थितीत घाबरू नका, सरकार पूर्णपणे तुमच्या पाठिशी आहे, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवली जाईल अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना आधार दिला.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुसऱ्या दिवशी मोरवड, पुसरा (वडवणी), तेलगाव (धारूर), नित्रुड, पात्रुड, हरकी लिमगाव (माजलगांव), मारफळा तांडा, अर्धमसला (गेवराई) आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतातील पीके पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकरी हताश झाला आहे, ना. पंकजाताईंना पाहून अनेक शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले.

राज्य सरकारने राज्यामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी आणि जनतेला मदत करण्यासाठी विविध उपाय योजना आखत आहेत. त्यामध्ये पीक कर्जांचे पुनर्गठन, जमीन महसूलात सवलत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, वीज पंपांच्या बिलात सवलत, जलसंधारणाच्या कामांना गती, दुष्काळामुळे वाळलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे यासारखी कामे केली जाणार आहेत. हे बळीराजाचे सरकार आहे. त्यामुळे तुम्हाला आम्ही वाऱ्यावर सोडणार नाहीत, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवू असं पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगत शेतकऱ्यांना आधार दिला.

या दौऱ्यात माजी आमदार केशवराव आंधळे, बदामराव पंडित, माधव निर्मळ, बाळदादा पवार, युद्धजित पंडित, संजय आंधळे, रूपाली कचरे, बाळासाहेब चोले, विनायक रत्नपारखी, अरूण राऊत, नितिन नाईकनवरे, ज्ञानेश्वर मेंडके तसेच उप विभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक लवकरच राज्यात

■ मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. हे पथक लवकरच राज्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेणार आहे. या पाहणीनंतर केंद्र सरकारला अहवाल सादर केला जाणार असून, शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या प्रक्रियेला यामुळे वेग येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. हे पथक लवकरच राज्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेणार आहे. या पाहणीनंतर केंद्र सरकारला अहवाल सादर केला जाणार असून, शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या प्रक्रियेला यामुळे वेग येण्याची शक्यता आहे.

राज्यातील दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे अंतरिम अहवाल पाठवून NDRF अंतर्गत मदतीचा प्रस्ताव दिला आहे. तसेच दिल्ली येथे झालेल्या रबी हंगामाच्या बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या अडचणी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. यावेळी महाराष्ट्रात केंद्राचे पथक पाठवण्याची मागणी करण्यात आली होती.

केंद्राकडून स्थापन करण्यात आलेल्या या पथकाचे अध्यक्ष कृषी व किसान कल्याण विभागाचे सहसचिव मुक्तानंद अग्रवाल असणार आहेत. पथकामध्ये केंद्र सरकारच्या विविध 10 विभागांतील अधिकारी सहभागी होणार आहेत. यामध्ये वित्त, कृषी, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, ग्रामविकास, जलशक्ती तसेच नीती आयोगासह संबंधित विभागांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या समन्वयाने हे पथक दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करणार आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता 2020 नुसार परिस्थितीचे मूल्यांकन करून केंद्राला अहवाल दिला जाईल. तसेच NDRF आणि SDRF अंतर्गत मदत, आवश्यक उपाययोजना आणि पुढील पुनर्वसनाबाबत शिफारशी केल्या जाणार आहेत.

राज्य सरकारच्या 26 सप्टेंबर 2026 रोजीच्या निर्णयानुसार राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. केंद्राचे पथक प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याने दुष्काळग्रस्त भागांना मदत मिळण्याच्या प्रक्रियेकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.





# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा 6 ऑक्टोबरचा संप मागे; आदिती तटकरे यांच्यासोबत सकारात्मक चर्चा

■ मुंबई : वृत्तसंस्था

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर 6 ऑक्टोबर 2026 रोजी होणारा प्रस्तावित संप मागे घेण्यात आला आहे. तसेच मुंबईतील आझाद मैदानावर काढण्यात येणारा मोर्चाही रद्द करण्यात येणार असल्याची माहिती आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी 2 ऑक्टोबर रोजी आझाद मैदानावर आंदोलन करण्याबाबत संघटनेने निवेदन दिले होते. त्यानंतर मंत्रालयात मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. शासनाकडून मागण्यांबाबत चर्चा करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाने 6 ऑक्टोबर रोजी पुकारलेला एकदिवसीय लाक्षणिक संप मागे घेण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर आझाद मैदानावर नियोजित असलेला मोर्चाही मागे घेण्यात येणार आहे. या बैठकीला महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासन आणि संघटनेमध्ये झालेल्या चर्चेनंतर आंदोलनाचा मार्ग तूर्तास टळला आहे. राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्याकडून महिला व बालकांशी संबंधित विविध शासकीय योजना आणि उपक्रम राबवले जातात. त्यामुळे त्यांच्या मागण्यांबाबत झालेल्या चर्चेला महत्त्व आहे. आता शासनाकडून या मागण्यांवर पुढील काळात कोणती कार्यवाही केली जाते, याकडे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# नाशिकमध्ये कांद्याच्या दरात घसरण पण ग्राहकांना ग्राहकांना दिलासा नाही

■ नाशिक वृत्तसंस्था

जवळपास महिनाभर कांद्याने घाऊक बाजारात उच्चांकी दर गाठलेला असताना आता नाशिकमध्ये घाऊक कांद्याचे दर घसरले आहेत. कारण कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून होणाऱ्या नवीन आवकेमुळे देशातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव येथील दरांवरील ताण कमी झाला आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला लासलगावमध्ये चांगल्या प्रतीचा कांदा घाऊक दरात ५५ रुपये प्रति किलो तर निकृष्ट कांदा हा ४५ रुपये प्रति किलोने विकला जात होता. आता महिन्याभरानंतर हे दर घसरले असून चांगल्या प्रतीचे दर ४६ रुपये तर निकृष्ट प्रतीचे दर ३५ रुपये प्रति किलोवर आले आहेत.

कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातून कांद्याची उपलब्धता वाढल्यामुळे दरात घट झाली असल्याचे लासलगाव एपीएमसीच्या संचालकांनी सांगितले. कर्नाटकातील मंडईमध्ये सध्या घाऊक दर हे मालाच्या गुणवत्तेनुसार ३५ ते ५१ रुपये प्रति किलो इतके आहेत. मात्र हॉटेल उद्योगाकडून नाशिकच्या कांद्यांना असलेली मागणी मजबूत असल्याचे आणि लासलगावमधील दरांमध्ये आणखी लक्षणीय घट होण्याची शक्यता नसल्याचे देखील संचालकांनी त्यांनी सांगितले.

# स्वयंपाकघरातील सौंदर्यवर्धना



- हातांची नखे, ओठ यांना दुधाची साय लावावी. साय लावल्यामुळे नखे मऊ राहतात. ओठांना भेगा पडत नाही व ते देखील मऊ होतात.
- दही हे सौंदर्य वाढीसाठी उपयुक्त आहे.त्वचेचे नैसर्गिक आवरण म्हणजेच आम्ल आच्छादन अबाधित ठेवण्यास दही काम करते. यात चंदन/लव्हेंडर/रोज असे सुगंध टाकून त्वचेला लावल्यास तेलकटपणा जाऊन त्वचा उजळते. दही केसांना पण उपयोगी आहे.
- लोणी काढल्यावर एक टेबल स्पून लोण्याने चेहरा, हात , गळा डोळ्याच्या आजूबाजूने मसाज करावा. मसाजची दिशा खालच्या बाजूने वरच्या बाजूला व आतून बाहेर अशी असावी. त्यातही वाळा/गुलाब तेल टाकून सुगंधी करावे.
- साजूक तुपाने तळपाय रात्री चोळावे. हिरड्यांना मसाज करावा. ओठांना लावावे. खूप फायदा होतो. तूप मात्र घरगुती, लोणकढे घ्यावे.

सौंदर्याची काळजी घेणे हे प्रत्येक स्त्रीला मनापासून वाटत असते. प्रथम मुलांची काळजी व नंतर घरातील इतर जणांची काळजी घेताना गृहिणी स्वतःलाच विसरतात. चाळीशी आली की त्वचा, डोळे, केस यांच्या विविध तक्रारी सुरु होतात. ब्युटीपार्लर मध्ये वारंवार जाण्यासाठी वेळ व पैसा दोन्हींची कमतरता जाणवते. पण प्रत्येक गृहिणींच्या हे लक्षात येत नाही की, स्वयंपाकघरातील अनेक पदार्थांचा सौंदर्यवर्धनासाठी खूप उपयोग होतो.स्वयंपाकघरातील पदार्थापासून स्वाद, गंध व शरीर-मनाची तृप्ती करणारे अन्नपदार्थ बनवले जातात. पण आपल्या रूपासाठी वेगळा एकही पैसा खर्च ण करता उपचार होतात. दुध, दही, तूप, मध, विविध भाज्या डाळी इ. पासून स्त्रियांना आपले सौंदर्य जोपासता येते.



## काय करता येईल

सकाळी दुध तापविण्यापूर्वी तीन ते चार टेबल स्पून दुध वातीत काढावे. ह्या दुधाने चेहरा, मान, गळा सर्व ठिकाणी चोळावे. घरगुती क्लिन्झिंग होऊन त्वचा साफ होते. या दुधात हळदीची चिमुट, ज्येष्ठमध, अनंतमूळ , चंदन, गुलाब, खस, मंजिष्ठ, नीम, संत्रासाल, तुळशी, पुदिना यापैकी एक पावडर अर्धा टेबल स्पून टाकून चेहऱ्याला लावावे. हे जमले नाही तर हळकुंड, चंदन इ. सहाणीवर उगाळावे. वाटल्यास त्यात बदाम उगाळावे, किंचित केशर टाकून दुधात मिसळून चेहऱ्यावर, मानेवर हातांना व गळ्याला चोळून लावावे. सुकले की चेहरा चोळून्न धुवावा.

# घरीच नैसर्गिक 'ब्लीच'

त्वचेच्या मृत पेशी घालविण्यासाठी अनेक महिला ब्लीच करतात. यामुळे चेहऱ्याचा रंग उजाळतो. परंतु नेमक्या कोणत्या कंपनीचे ब्लीच वापरावे हे बहुतेक जणांना समजत नाही. यामुळे चुकीच्या सौंदर्यप्रसाधनामुळे विपरित परिणाम होतात. यासाठी घरीच करा नैसर्गिक ब्लीच...



**टोमॅटो** – टोमॅटो एक सौंदर्यवर्धक फळ आहे. पिकलेल्या टोमॅटोचा रस घेऊन पूर्ण चेहऱ्यावर मसाज करा. यानंतर पाण्याने चेहरा धुवा. असे काही दिवस नियमित केल्यास तुम्हाला नक्कीच फरक जाणवेल.

**दही**– दह्यामध्ये अनेक प्रकारचे घटक असतात. यातील लॅक्टीक ॲसिड त्वचा उजळण्याचे काम करते. चेहऱ्यावर दही लावून काही वेळासाठी तसेच ठेवा. त्यानंतर चेहरा पाण्याने धुवून घ्या. हा प्रयोग सलग दोन आठवडे करा. तुम्हाला नक्कीच ब्लीचचा परिणाम दिसेल.

**लिंबू** – लिंबू एक नॅचरल ब्लीच आहे. झोपण्याच्या अगोदर चेहऱ्यावर लिंबाचा रस लावून झोपा. हे काही दिवसांच्या अंतराने करत राहा. चेहरा उजळ होण्यास मदत होईल.

**बटाट्याचा रस** – बटाट्याचा रस चेहऱ्यावर काही वेळासाठी लावून ठेवा. त्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवा. हे आठवड्यातून एक वेळी केल्यास काही महिन्यात तुम्हाला फरक दिसेल.

# सावळी त्वचा, नो वे



आपल्या त्वचेवरील सावळी छाया आपल्या सौंदर्याला ग्रहण लावत असते. आपल्या नाजूक व सुंदर चेहऱ्यावरील सावळी छाया दुर करण्यासाठी काही टिप्स...

- लिंबू त्वचेसाठी फारच गुणकारी आहे. याचा प्रयोग वेगवेगळ्या फेसपॅकमध्ये करू शकता.
- दुधाच्या सायीत लिंबाचा रस टाकून तयार झालेली पेस्ट चेहऱ्यावर लावावी. त्यानंतर 10 मिनिटांनी चेहरा गरम पाण्याने धुऊन घ्यावा.
- गुडघे व हाताचे कोपरे जर काळपट पडले असतील तर त्यावर लींबाच्या साली घासाव्यात.
- बिटच्या रसात टोमॅटोचा रस व चिमूटभर हळद मिसळून चेहऱ्यावर लावल्याने काळे डाग नाहीसे होतात.
- द्राक्षाच्या रसात मध टाकून चेहऱ्यावर लावावे.

# झटपट मेकअप करा

ऑफिसमध्ये आपण बराच वेळ राहतो. मात्र मेकअप काही टिकून राहत नाही. त्यातच एखाद्या मीटिंग किंवा पार्टीमध्ये जावे लागले तर झटपट मेकअप कसा करायचा हेदेखील लवकर सुचत नाही. त्यामुळे परफेक्ट मेकअप करायाच्या टिप्स घेतल्या तर तुम्ही ऑफिसमध्येदेखील स्मार्ट आणि सुंदर दिसू शकता.





## सकाळचा मेकअप

सकाळी कार्यक्रम असेल तर नैसर्गिक आणि हलका मेकअप करा. त्यावेळेस शायनी किंवा शिमरचा उपयोग कमी करावा. आयशॅडोही हलक्या रंगाचा वापरावा. ब्लशर जास्त गडद करू नये. लिपस्टिकही मॅटफिनिशची वापरावी.

## संध्याकाळचा मेकअप

हायलायटिंग एरियावर शिमर करावं. इव्हिनिंग मेकअपमध्ये शिमरचा उपयोग केला तरी चालतो. आयशॅडो गडद आणि ग्लिटरबेस्ड करू शकतो. ब्लशर डार्क आणि फेसकट बघून करावं. लिपस्टिकवर लिपग्लॉसही उठून दिसतो.

## मेकअपचे तंत्र

मेकअपसाठी अंडाकृती चेहरा चांगला मानला जातो. जर चेहरा चौकोनी, त्रिकोणी, गोल, हार्ट किंवा डायमंड शेपचा असेल, तर मेकअपमधील काही विशिष्ट प्रॉडक्ट्सच्या साहाय्याने फेस कटिंग करून घ्यावा लागतो.

- चेहरा धुतल्यावर चांगल्याप्रकारे मॉइश्चराइज करा नंतर फाउंडेशन लावा. फाउंडेशन नेहमी ब्रशने लावले पाहिजे, बोटाने ते पूर्ण चेहऱ्यावर सारखे लागत नाही. फाउंडेशन नेहमी गळ्यापर्यंत लावले पाहिजे. नंतर पावडरने मेकअपला फायनल टच द्यायला हवा.
- ऑफिसमध्ये अचानक एखाद्या मीटिंगला जावे लागले तर थोडे टचअप जरुरी असते. त्यासाठी आपल्या पर्समध्ये एक मिनीमेकअप किट नक्कीच ठेवा. त्यात लिप ग्लॉस, ब्लशर, आयशेडो आणि फेस पावडर असायला हवे. शिवाय टी-स्नॅक्स किंवा लंचनंतर थोडी लिपस्टिक लावून पुन्हा फ्रेश दिसू शकता
- मेकअप रिमूव करण्याचाही वेळ नसेल तर तुम्ही त्यालाच रिफ्रेश करू शकता. यासाठी नाइट रिपेयर क्रीमचे काही थेंब हातावर घेऊन चेहऱ्यावर लावा, नंतर फेस पावडर लावा. चेहऱ्यावर डाग , खड्डे असतील त्यांनी फाउंडेशन लावण्यासाठी कन्सीलर लावावे.
- आपला पेहराव आणि वेळ याचा व्यवस्थित विचार करून मेकअप करावा. आपल्या त्वचेच्या रंगानुसार मेकअपच्या शेड्स निवडाव्यात. मेकअप करण्याआधी सर्वप्रथम चेहरा स्वच्छ घ्यावा. नंतर त्वचेनुसार टोनर, मग मॉइश्चरायझर लावा. त्यानंतर फाउंडेशनचा बेस तयार करून घ्या. यानंतर डोळ्यांचा मेकअप करावा. आधी आयशॅडो लावून मग आय-लायनर लावावं. नंतर मस्करा आणि मग ब्लशर लावावा. डोळ्यांना अनुसरून काजळ लावावं. डोळ्यांचा मेकअप झाल्यावर लिपस्टिक लावावी. लिपस्टिक लावताना आउटलाइन करून घ्यावी आणि मग त्यात लिपस्टिक लावावी. त्यानंतर लिपग्लॉस लावावा. सर्वात शेवटी कॉम्पॅक्ट किंवा ट्रान्सलुझन्ट पावडर लावावी.

# दलाई लामा



दलाई लामा म्हणजे तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. चौदावे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो सध्याचे दलाई लामा आहेत. चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे. पहिल्या लामांनंतर प्रत्येक नवा दलाई लामा हा पूर्वीच्या लामाचा अवतार मानला जाऊ लागला.

सध्या दलाई लामा हे तिबेटीय लोकांचे सर्वोच्च धार्मिक नेते व शासन प्रमुख देखील आहेत. इ.स. 1391 ते इ.स. 1933 या कालखंडात तेरा दलाई लामा होऊन गेले. तिबेटीय परंपरेनुसार ज्येष्ठ धर्मगुरु व शासन मिळून नवीन दलाई लामा निवडीची जबाबदारी पार पाडतात.दलाई लामा तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. सध्याचे दलाई लामा आहेत. चौदावे दलाई लामा तेंझिन गियात्सो चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे.

# गुलामगिरीची सवय नको



एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायलाप्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई. अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्याच्याहातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंज-यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य** : जास्त काळ पारतंत्र्यात( गुलामगिरीत ) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते.

# कविता

## ताई रडू नको !

ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
तुझे आसू माझ्या गाली,
ओघळती वाटते!
नीज माझ्या मांडीवरी
गातो तुला मी अंगाई
डहाळीची दोन फुले
माझी तुझी एक आई
मीट पाहू डोळे ओले
कापरे की ओठ ते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
किती किती
दिवसांनी तुझी माझी
झाली भेट
जन्म झाल्यापासूनिया
पहातो मी गे तुझी वाट
पुन्हा पुन्हा का ग डोळा
पाणी तुझ्या साठते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते !
देतो तुला माझा खेळ
ताई नको गं रागाऊ
चिमणीच्या दातांनी
माझ्यातला देतो खाऊ
पापे देतो गालाचे मी

# प्राण्यांची ओळख

## पांढरा अवाक





कोंबडीपेक्षा मोठा साधारण 75 सें. मी. आकाराचा पांढरा अवाक पक्षी मुख्यत्वे काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच, डोके आणि मान तसेच पाय काळ्या रंगाचे असून उर्वरीत पक्षी पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच लांब आणि बाकदार असते. वीण काळात नराच्या पाठीकडील भाग आणि पंख काळपट करड्या रंगाचे होतात. एरवी नर-मादी दिसायला सारखेच असतात. हे पक्षी पाणथळ भागात थव्याने राहतात.भारतासह नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार, जपान पर्यंत दक्षिण आशियाई देशात पांढरा अवाक पक्ष्याचे वास्तव्य आहे. हे भारतात निवासी आणि स्थानिक स्थलांतर करणारे आहेत. दलदलीचे प्रदेश, सरोवरांच्या भागात आढळणारा हा पक्षी काळा अवाक तसेच बगळ्यांसह राहतो. सकाळ-संध्याकाळ एखाद्या झाडावर सर्व एकत्र जमतात. अशा जागेला सारंगागार म्हणतात.उथळ पाण्यात चोच बुडवून एकट्याने आणि लहान-मोठ्या थव्याने हे पक्षी दिवसभर खाद्य शोधत फिरतात. सरडे, गोगलगाय, बेडुक, मासोळ्या, खेकडे वगैरे पाण्यात राहणारे जीव पांढरा अवाक पक्ष्यांचे खाद्य आहे.

# छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थांची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वतःचे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



## टॉमेटो जिंजर सूप

### साहित्य

६ मोठे टॉमेटो १ टिस्पून आले, किसलेले १/४ टिस्पून लाल तिखट १/२ टिस्पून सोया सॉस १ टेस्पून पाइनॅपल क्रश चवीपुरते मिठ चवीपुरती साखर १/२ चमचा लिंबू रस

### कृती

टॉमेटो उकडून घ्यावे. उकडलेले टॉमेटो, साधारण दीड कप पाणी, आले, लाल तिखट, अननस, मिठ, साखर आणि लिंबू रस एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटावे. गाळण्यातून गाळून घ्यावे. पातेल्यात घालून एक उकळी काढावी. चव पाहून गरजेचे जिन्नस घालावे. सोया सॉस घालून सूप सर्व्ह करावे.

# दिलेल्या चित्रात रंग भरा



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# दुष्काळी पंचनाम्यांसाठी सरपंच प्रदीप मुंडे मैदानात; प्रशासनाला सोबत घेऊन केली पीक पाहणी!

## तळेगावात सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान; कृषी व महसूल विभागाकडून पंचनाम्यांना वेग

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील तळेगाव परिसरात पावसाअभावी सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन सरपंच प्रदीप सूर्यभान मुंडे यांनी प्रशासनाला सोबत घेऊन प्रत्यक्ष शेतशिवारात पीक पाहणी केली. यावेळी परळी तालुका कृषी अधिकारी अर्चना नागरगोजे, तलाठी व संबंधित कर्मचाऱ्यांच्या पथकाने नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे सुरू केले. सरपंचांनी पुढाकार घेत प्रशासनाला शेतकऱ्यांच्या बांधावर आणल्याने पंचनाम्याच्या कार्यवाहीला वेग आला आहे.

तळेगाव शिवारात पावसाने मोठी दडी मारल्याने सोयाबीनची पिके सुकून गेली असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन सरपंच प्रदीप मुंडे यांनी कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी सोयाबीनच्या झाडांची, शेंगांची तसेच पिकांच्या सद्यस्थितीची प्रत्यक्ष तपासणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

प्रशासनाच्या पथकाकडून नुकसानीचे स्वरूप, बाधित क्षेत्र व पीक परिस्थितीची माहिती संकलित करण्यात येत असून पंचनाम्याची प्रक्रिया वस्तुनिष्ठ आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळावी, यासाठी एकही बाधित शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, सरपंच प्रदीप सूर्यभान मुंडे यांनी प्रशासनाला सोबत घेऊन केलेल्या या प्रत्यक्ष पीक पाहणीमुळे तळेगावातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचा प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आला आहे. पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**शेतकऱ्यांच्या बांधावर सरपंच ; प्रशासनाला सोबत घेऊन नुकसानीची पाहणी!**

तळेगावातील दुष्काळी परिस्थितीची गंभीरता ओळखून सरपंच प्रदीप सूर्यभान मुंडे यांनी केवळ निवेदनापुरते मर्यादित न राहता कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेत थेट शेतशिवार गाठले. नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनाम्याची कार्यवाही सुरू केली. शेतकऱ्यांचे नुकसान प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी सरपंचांनी घेतलेला हा पुढाकार सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.



## सिनेरंग



# मृत्यूचक्र' चित्रपटाचा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर प्रदर्शित!

मराठी चित्रपटसृष्टीच्या समृद्ध परंपरेत आशयाची वेगळी वाट चोखाळणाऱ्या आणि प्रेक्षकांच्या विचारविश्वाला धक्का देणाऱ्या कथांना नेहमीच विशेष स्थान मिळाले आहे. याच परंपरेत आता मानवी अस्तित्व, कर्माचे गूढ, मृत्यूचे अटळ चक्र आणि अनाकलनीय घटनांची मालिका यांचा रहस्यमय पट उलगडणारा 'मृत्यूचक्र' हा सस्पेन्स-थ्रिलर दाखल होत आहे. मृत्यूच्या पलीकडे दडलेले गूढ, कर्माच्या हिशेबाचा अनाकलनीय खेळ आणि भयाची सावली यांची उत्कंठावर्धक सांगड घालत 'मृत्यूचक्र'ने प्रदर्शनापूर्वीच कुतूहलाची ठिणगी पेटवली आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे विश्वस्त राजाराम देशमुख, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, उपाध्यक्ष धनाजी यमकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. येत्या २३ ऑक्टोबरला हा रहस्यमय थरार संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत उलगडणार आहे.श्री महादेव फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत आणि अध्यांश मोशन पिक्चर निर्मित या बहुचर्चित चित्रपटाची निर्मिती प्रणाली उन्मेश वाघमोडे यांनी केली आहे, तर दिग्दर्शनाची धुरा विलास वाघमोडे आणि अनुप्रिता कडू-गंगावणे यांनी सांभाळली आहे. ट्रेलरमध्ये दृश्यांची केलेली गुंफण खिळवून ठेवणारी आणि मनाचा ठाव घेणारी आहे. एका गूढ चक्राची टिक-टिक करणारी चाहूल, धूसर प्रकाशात उलगडणाऱ्या प्राचीन वास्तू, गूढ अंधाराचे सावट, सिरीयल किलरची दशहत, रहस्यमय वातावरण आणि शांततेला चिरत जाणारी भीतीदायक पार्श्वसंगीत अंगावर काटा आणते.



# टेलीरंग माधुरी दीक्षितचा 'कोण होणार करोडपती' लवकरच सोनी मराठीवर

**माधुरी दीक्षितची एंट्री म्हटली की सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळणारच! 'कोण होणार करोडपती'च्या चित्रीकरणाच्या पहिल्या दिवशीही तिचा असाच देखणा अंदाज पाहायला मिळाला. साडीतील मोहक रूप आणि चेहऱ्यावरचे प्रसन्न हास्य घेऊन या 'धकधक गर्ल'ने सूत्रसंचालिका म्हणून आपल्या नव्या प्रवासाला सुरुवात केली.चित्रीकरणाच्या पहिल्या दिवसाच्या या फोटोंमधून माधुरीच्या नव्या भूमिकेची झलक पाहायला मिळत आहे. तिचं मनमोहक हास्य आणि सहजसुंदर वावर यामुळे या फोटोंवरून नजर हटवणं कठीण होऊन जातं. सूत्रसंचालिकेच्या खुर्चीत विराजमान होण्यासाठी सज्ज झालेल्या माधुरीचा हा अंदाज चाहत्यांसाठी नक्कीच खास ठरणार आहे.अभिनय आणि नृत्याने प्रेक्षकांची मनं जिंकणारी माधुरी आता आपल्या मातृभाषेत, मराठीतून स्पर्धकांशी संवाद साधणार आहे. तिचा आपुलकीचा स्वभाव आणि लोकांशी सहज जुळणारं नातं यामुळे प्रश्नोत्तरांच्या खेळासोबतच गप्पाही तितक्याच रंगतील, अशी अपेक्षा आहे.१२ ऑक्टोबरपासून हा शो सोनी मराठीवर पाहता येणार आहे.**

# पाच फुटाचा बच्चन' ९ ऑक्टोबरला रुपेरी पडद्यावर झळकणार



**कीर्तनातून प्रसिद्धीस आलेल्या एका तरुणीची गोष्ट सांगणाऱ्या 'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात लाँच करण्यात आला. चित्रपटाच्या टीजरला भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर आता ट्रेलरमुळे चित्रपटाविषयी आणखी उत्सुकता निर्माण झाली असून, हा चित्रपट ९ ऑक्टोबरला रुपेरी पडद्यावर झळकण्यास सज्ज झाला आहे.'पाच फुटाचा बच्चन' या चित्रपटात तरूण कीर्तनकार मुलीची गोष्ट आहे. तिच्या कीर्तनात कोल्हापुरी भाषा आहे. संतांचे अभंग तिला मुखोद्गत आहेत. जनमानसात तिचं प्रचंड नाव आहे. उंचीने पाच फूट असलेल्या या तडफदार मुलीला 'पाच फुटाचा बच्चन' म्हणून ओळखलं जातं. या प्रमुख भूमिकेतून श्रुती मधुदीप ही अभिनेत्री पदार्पण करत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या ट्रेलरने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. यात तगड्या कलाकारांची फौज आहे. मराठी मनाला भावणाऱ्या कीर्तन या विषयाला हा सिनेमा साद घालतो आहे, असं दिसतं आहे. अवघ्या अडीच मिनिटाचा हा ट्रेलर अत्यंत नाट्यमय असून त्यातील दृश्यांनी प्रेक्षकांची मने खिळवून ठेवली आहेत. या चित्रपटात नेमकं काय घडणार आहे, याची उत्सुकता आता शिगेला पोचली आहे.**

संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार , 06 ऑक्टोबर 2026

Last page

# लक्ष्मण वाकडे यांचा मुंबईत राज्यस्तरीय उपक्रमशील आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या परळी येथील उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एल.आय. वाकडे यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल पुणे येथील कल्याणम् एज्युकेअर या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा 'राज्यस्तरीय उपक्रमशील आदर्श शिक्षक पुरस्कार' देवून गौरविण्यात आले आहे.

मुंबई येथील आझाद मैदान परिसरातील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात गेल्या शुक्रवारी (ता.२) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राज्यातील सर्व जिल्ह्यातून निवडले गेलेल्या सुमारे ७५ वर आदर्श शिक्षकांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या समारंभाला माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, समृद्धी महामार्गाचे मुख्य अभियंता साहेबराव सुरवसे, मीराभाईंदर महानगरपालिकेच्या माजी महापौर निर्मलाताई सावळे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव कांडेकर, सिने अभिनेत्री दिव्यांशी डे, कल्याणम् एज्युकेअरचे प्रमुख अॅड. कल्याण नेहरकर आदी मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, गौरवपत्र देवून, फेटा बांधून श्री वाकडे यांचा गौरव करण्यात आला. मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर संजय घाडी यांनी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

गेल्या चार दशकांपासून परळीच्या शिक्षण, समाजकार्य, पत्रकार व सहकार अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेलेल आदर्श व उपक्रमशिल शिक्षक म्हणून एल.आय.वाकडे यांची ओळख आहे. त्यांची विविध विषयावरील पंचवीसवर पुस्तिके प्रकाशित झालेली आहेत. शाळकरी मुलांसाठी त्यांनी विपुल लेखन केले आहे. याशिवाय विविध विषयांवर वर्तमानपत्रातून त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून कल्याणम् एज्युकेअर पुणे या संस्थेने उपक्रमशील आदर्श शिक्षक म्हणून त्यांची निवड करून या समारंभात गौरव केला. या गौरवाबद्दल श्री वाकडे यांचे येथे शिक्षक, पत्रकार व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, या पुरस्काराबद्दल न्यू हायस्कूल, नवीन प्राथमिक शाळेत त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक डॉ.बी.आर.चव्हाण, पर्यवेक्षक सतीश शहापुरे, दाजीबा नखाते, उमेश देशमुख, बाबासाहेब मुंडे, अमोल कांबळे, वर्षा हाके आदी मान्यवरांसह शाळेतील शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.



# वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांचे प्रबोधन

## मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाचा जनजागृती उपक्रम; विविध शाळांमध्ये मार्गदर्शन

**आष्टी | प्रतिनिधी**

वन्यजीव सप्ताह २०२६ चे औचित्य साधून आष्टी वन विभागाच्या वतीने तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रबोधन व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व, निसर्गाचा समतोल आणि वाढता मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल जायभाये, वनपाल एल. व्ही. तागड यांच्यासह वनरक्षक एस. बी. शिंदे, ए. एस. काळे, जे. बी. आरगडे, बी. ए. शिंदे, डी. बी. शेळके, के. डी. पदलवाड, के. बी. विदाते आदी वन कर्मचाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबविण्यात आले. १ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा, ३ ऑक्टोबर रोजी रोडेश्वर विद्यालय डोंगरगण व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेवाडी, तर ५ ऑक्टोबर रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय बीडसांगवी येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये अन्नसाखळीतील प्रत्येक सजीवाचे महत्त्व तसेच निसर्गाचा समतोल राखण्यात वन्यजीवांची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. बिबट्या व वाघ यांसारख्या वन्यप्राण्यांमुळे



निर्माण होणारा मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहजीवन टिकविण्यासाठी वन्यजीवांविषयी असलेली भीती व गैरसमज दूर करून त्यांच्याबद्दल आपुलकी व आदराची भावना निर्माण करण्याचे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शाळा प्रशासन तसेच विद्यार्थ्यांनी स्वागत केले.

# 'शिक्षण व्यवस्था मजबूत करणारा सक्षम आमदार विधान परिषदेत पाठवा'

### शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय देणारा अभ्यासू लोकप्रतिनिधी निवडण्याचे प्रा. अजित इथापे यांचे आवाहन

**आष्टी | प्रतिनिधी**

ढासळलेली शिक्षण व्यवस्था मजबूत करणारा, शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय देणारा आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी सभागृहात प्रभावीपणे मांडून त्यावर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा करणारा सक्षम लोकप्रतिनिधी विधान परिषदेत पाठविणे गरजेचे आहे, असे मत शिक्षक संघटनेचे तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा. अजित इथापे यांनी व्यक्त केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित मतदार जनजागृती अभियानादरम्यान ते बोलत होते.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर मतदारसंघांसह दोन शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), पुणे आणि नागपूर पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघांचा यामध्ये समावेश आहे.

विना अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान मिळावे, यासाठी शिक्षकांनी अनेक वर्षे आंदोलने केली. अनेक शिक्षकांनी आर्थिक अडचणींचा सामना करत विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य सुरू ठेवले. मात्र, कायम अनुदानाच्या धोरणामुळे अनेक शिक्षकांना २०, ४० आणि ६० टक्के अनुदानाच्या टप्प्यांवरच सेवा बजावावी लागत असून, अनुदानाच्या प्रत्येक टप्प्यासाठी आंदोलने आणि उपोषणाच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करावा लागत असल्याचे प्रा. इथापे यांनी सांगितले.

शिक्षकांचे वेतन, पेन्शन योजना, थकीत बिले तसेच अनुदानाचे प्रश्न आजही प्रलंबित असून काही शिक्षकांना दीर्घकाळ सेवा करूनही पूर्ण अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. काही शिक्षकांनी १४ वर्षे विनाअनुदानित सेवा, त्यानंतर दोन वर्षे २० टक्के, दोन वर्षे ४० टक्के आणि केवळ एक वर्ष ६० टक्के अनुदानावर सेवा बजावत निवृत्ती घेतल्याचेही इथापे यांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता त्यांचा अभ्यास करून विधान परिषदेत सातत्याने आवाज उठविणारा लोकप्रतिनिधी आवश्यक आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर परिस्थितीला दोष देण्यापेक्षा मतदानाच्या वेळी योग्य, अभ्यासू आणि सक्षम व्यक्तीची निवड करून शिक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन प्रा. अजित इथापे यांनी मतदार जनजागृती अभियानातून केले.

# मराठवाडा शिक्षक संघाने पदवीधर मतदार संघाची निवडणूक सर्व ताकदीनिशी लढवावी - पी.एस.घाडगे

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

२३ आक्टोंबर रोजी होणारी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणूक मराठवाडा शिक्षक संघाच्या बहाद्दर कार्यकर्त्यांनी सर्व ताकदीनिशी लढवावी तशी लढवल्यास विजय निश्चित मिळेल असे प्रतिपादन व आवाहन पी.एस. घाडगे यांनी केले.

आज दि.५ आक्टोंबर रोजी मराठवाडा शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार सुशील घोटे पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मराठवाडा विभागाच्या आठ ही जिल्ह्यातील संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने छत्रपती संभाजीनगर येथे आले होते.यावेळी कार्यकर्त्यांच्या बैठकीस मार्गदर्शन करताना घाडगे बोलत होते.यावेळी व्यासपीठावर संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कार्याध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, उपाध्यक्ष बी.टी. सांगळे,प्रा.मारोती तेगमपुरे,सिनेट सदस्य प्रा.उमाकांत राठोड व उमेदवार सुशील घोटे पाटील उपस्थित होते. पुढे बोलताना घाडगे म्हणाले की, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे गेल्या अठरा वर्षांपासून प्रतिनिधित्व





करत असलेले विद्यमान आमदार हे शिक्षक, प्राध्यापक व पदविधर यांचे प्रश्न सोडवण्यात पुर्णपणे अपयशी ठरल्यामुळे त्यांच्या विरोधात पदवीधारकामध्ये तीव्र नाराजी आहे.याचा फायदा आपल्या उमेद्वारास होणार आहे.म्हणून या संधीचा फायदा मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेऊन हि निवडणूक पुर्ण ताकदीने लढवल्यास विजय निश्चित मिळेल असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी उमेदवार सुशील घोटे पाटील यांनी माझ्या सारख्या सर्व सामान्य व्यक्तीला उमेदवारी दिली त्याबद्दल शिक्षक संघाचे आभार मानले व माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला थोडासुद्धा तडा जाऊ देणार नाही असा शब्द दिला. यावेळी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राबवयाची प्रचार यंत्रणा याबाबत योग्य सुचना व मार्गदर्शन केले.बैठकीचे सुत्रसंचालन राजकुमार कदम यांनी तर आभार प्रदर्शन भाई चंद्रकांत चव्हाण यांनी मानले. संघटनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एक जुटीने व एक दिलाने काम करण्याचा शब्द व्यासपीठास व उमेद्वारास दिला.